24 X7 तक्रार

क्रमांक/फौजदारी/24X7/ मोहिते /2019
उपविभागीय अधिकारी कार्यालय,
चिपळूण दिनांक 20/06/2019

प्रति,

मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी
(सर्वसाधारण शाखा )

विषय :- रत्नागिरी 24 X 7 तक्रार निवारण कक्षात नोंदविलेल्या तक्रारीबाबत.
श्री. गितेश सुगनदास बुधाजी माहिते रा. कोतळूक ता. गुहागर

महोदय,

उपरोक्त विषयान्वे रत्नागिरी 24 X 7 ला आलेल्या तक्रार अर्जकामी खालील प्रमाणे वस्तुस्थिती सादर करणेत येत आहे.

तक्रारदार श्री. गितेश सुगनदास बुधाजी मोहिते रा. कोतळूक ता. गुहागर यांचा भाऊ प्रविण सुगनदास मोहिते यांनी दिनांक 24/05/2019 रोजी बौध्द जातीचा दाखला मिळावा म्हणून सेतू कार्यालय गुहागर येथे अर्ज दाखल केलेला होता. त्यानुसार सेतू कार्यालय गुहागर यांनी तारीख 07/06/2019 रोजी सायंकाळी 05.10 वाजता ऑनलाईन दाखला तयार केला. व तो पुढील कार्यवाहीसाठी डेस्क 3 युजर 1 म्हणजेच उपविभागीय अधिकारी कार्यालय चिपळूण येथील दाखला तपासणी टेबलकडे सादर केला. दरम्यानचे काळात सदर दाखल्यामध्ये वंशावळ सिध्द होत नसलेबाबत तक्रारदार यांना ते या कार्यालयात चौकशीसाठी आले असता समक्ष दिनांक 14/06/2019 रोजी त्यांना वंशावळ सिध्द होत असलेबाबतचा पुरावा सादर करणेबाबत तोंडी सुचना देणेत आल्या होत्या परंतू त्यांनी दिनांक 17/06/2019 पर्यंत तसा पुरावा या कार्यालयात सादर केला नव्हाता. तदनंतर दिनांक 17/06/2019 रोजी तक्रारदार यांनी सेतू कार्यालय गुहागर येथे संपर्क करुन तेथील सेतू प्रमुख श्री. भागडे यांचे व्हॉट्सअॅप वरुन या कार्यालयातील श्रीमती कमलावार मॅडम यांचे व्हॉट्सअॅप वर सायं 05.41 वाजता पुरावा प्राप्त झालेला असल्याने तो ऑनलाईन अपलोड करणेसाठी अर्जदार यांचे प्रकरण ऑनलाईन पध्दतीने सेतू कार्यालयाकडे पुन्हा माघारी पाठवावे असे कळविलेने सदरचा दाखला तपासणी टेबल यांनी तारीख 17/06/2019 रोजी सायं. 07.00 वाजता ऑनलाईन तपासून त्यामध्ये वंशावळ सिध्द होत नसल्याने तसा शेरा लिहून तो दाखला पुन्हा सेतू कार्यालयाकडे परत पाठविला.

तदनंतर तक्रारदार यांनी त्यांचे कुटुंबाचे वंशावळीचा अन्य पुरावा सेतू कार्यालयात सादर केला व सेतू कार्यालयाने सदरचा नवीन पुरावा दिनांक 17/06/2019 रोजी सायं. 07.11 वाजता ऑनलाईन अपलोड करुन तो दाखला डेस्क 3 युझर 1 म्हणजेच उपविभागीय अधिकारी कार्यालय तपासणी टेबलकडे पाठविला. डेस्क 3 युझर 1 यांनी सदरचा दाखला 18/06/2019 रोजी त्याच दिवशी उपविभागीय अधिकारी यांचे स्वाक्षरीकरीता पाठविला. उपविभागीय अधिकारी यांनी तारीख 18/06/2019 रोजी सायं. 4.12 वाजता त्यावर डिजिटल स्वाक्षरी केलेली आहे. सदरची स्वाक्षरी करीत असताना त्यावेळी सर्व्हरला तांत्रिक बिघाड झाल्याने सदरची डिजिटल स्वाक्षरी व्यवस्थित होऊ शकलेली नाही. म्हणजेच तांत्रिक चुक झालेली होती त्यामुळे सदरच्या दाखल्याची प्रिंट घेतली असता तो कोरा येत होता. या सर्व बाबतचे पुरावे सोबत माहीतीसाठी सादर करणेत येत आहे.

Scanned by CamScanner

अर्जदार यांनी तारीख 24/05/2019 रोजी अर्ज सादर केले पासून दिनांक 14/06/2019 पर्यंत दाखल्याबाबत सेतू कार्यालय अगर या कार्यालयात कोणताही संपर्क केलेला नव्हता. तक्रारदार यांना त्यांचा महत्वाचा पुरावा प्रकरणी नाही याची स्पष्ट कल्पना अर्ज सादर करतानाच होती. परंतू त्यावेळी गट विकास अधिकारी पंचायत समिती गुहागर यांनी प्रस्तुत दाखला दाखल करुन घ्या स्वाक्षरीसाठी मी प्रांताधिकारी यांचेशी बोलेन असे सेतू कार्यालयास व या कार्यालयास दुरध्वनी वरुन सांगितल्याने एका वरिष्ठ अधिकारी यांनी त्याबाबत जबाबदारी घेतली असल्याने त्यामध्ये लेखी फरक काढण्यात आले नव्हते व याची सर्व कल्पना तक्रारदार याना होती व आहे. तसेच दाखला अर्जंट होता तर तक्रारदार यांनी दिनांक 24/05/2019 पासुनच प्रयत्न केले असते तर तो दाखला सर्व पुराव्यानिशी त्यांना वेळीच प्राप्त झाला असता. परंतू तसा तो जरी प्राप्त झाला नसला तरी दिनांक 18/06/2019 रोजी त्यांचे दाखल्यावर स्वाक्षरी झालेली होती. सदरचा दाखला त्यांना दिनांक 18/06/2019 रोजी रात्रो 12.00 वाजेपर्यंत अपलोड करणेचा होता. परंतू स्वाक्षरीचे वेळीच तांत्रिक बिघाड आल्याने दाखल्यावर स्वाक्षरी होऊनही तो सेतू कार्यालय गुहागर येथे डाऊनलोड न झाल्याने मिळू शकला नाही. या बाबत जिल्हाधिकारी कार्यालयातील तांत्रिक शाखा यांचेशी संपर्क करणेत आला होता. परंतू त्यांचेकडून server error असे सांगणेत येऊन प्रांताधिकारी यांना पुन्हा सदरचा दाखला रिॲप्रुव्ह करणेस सांगावे असे सांगण्यात आले त्याप्रमाणे प्रांताधिकारी यांचेकडे तशी लेखी टिपणी ता. 19/06/2019 सादर करणेत आली. त्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी यांनी पुन्हा सदरचा दाखला रिअप्रुव्ह करुन त्याची प्रिंट तक्रारदार यांना तात्काळ प्राप्त झालेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता तक्रारदार यांचे अर्ज कामी यांची तक्रार ही बिनबुडाची असून त्याबाबत या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची दिरंगाई अथवा विलंब झालेला नाही. तक्रारदार यांचेच निष्काळजीपणामुळे त्यांना विलंब झालेला आहे. वास्तविक पहाता तक्रारदार यांना त्यांचा दाखला वेळीच मिळणेबाबत या कार्यालयाकडून असंख्य सहकार्य करणेत आलेले आहे. तरी तक्रारदार यांचा अर्ज निकाली काढणेत यावा हि विनंती.

आपला विश्वासू,

**उपविभागीय अधिकारी**
**चिपळूण विभाग**

Scanned by CamScanner